RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ३३(२)] गुरुवार, जून २९, २०१७/आषाढ ८, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ६२

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे कार्यालय

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक ९ जानेवारी २०१५

**उद्देशिका**

क्रमांक आरबी/टीसी/ई-११०१९(१५)(२०१४)/अधिसूचना-६/२४/२०१५.—**ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, अधिसूचना क्र. आरबी/टीसी/ई-११०१९ (१५) (२०१४)/अधिसूचना-३/बांबू-एमएफपी/७४१, दिनांक १९ ऑगस्ट २०१४ द्वारे असा निदेश दिला आहे की, महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांमधील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ (११९८ चा महा. ३) हा विवक्षित फेरबदलांसह अनुसूचित क्षेत्रांना लागू होईल ;

**आणि ज्याअर्थी,** यासंबंधात पुढील निदेश देणे इष्ट आहे.

**त्याअर्थी,** आता भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे उक्त अधिनियमामध्ये पुढीलप्रमाणे आणखी फेरबदल करीत आहेत :—

**अधिसूचना**

**भारताचे संविधान**

भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे असे निदेश देत आहेत की, महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांमधील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ (१९९८ चा महा. ३) हा पुढीलप्रमाणे आणखी फेरबदलांसह अनुसूचित क्षेत्रांना लागू होईल :—

महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांमधील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ (१९९८ चा महा.३) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) मध्ये पुढील परंतुक अंतर्भूत करण्यात येईल :—

“ परंतु, यासंबंधात संबंधित पंचायत व ग्रामसभेच्या ठरावाद्वारे केलेल्या मागणीवरुन त्यांच्या वतीने तेंदु व आपट्याची पाने खरेदी करणे, त्यांची वाहतूक करणे व त्यांची विल्हेवाट लावणे, वन विभागासाठी कायदेशीर असेल आणि त्यानंतर महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९ च्या तरतुदी व त्याअंतर्गत केलेले नियम आणि यासंबंधात वेळोवेळी काढण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.”

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
राज्यपाल यांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.